● महाराष्ट्र शासन ●

**श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर**

Opposite District Court, Civil Chowk, Solapur- 413 003, Maharashtra State, INDIA

Dean : 0217-2319448, 2749401 • Fax : 0217-2310766 • e-mail:- deansolapur@gmail.com

जा.क्र.श्रीछशिमसरुसो/आस्था/वर्ग-१व२/4912-13/२०२५ दिनांक 08/१०/२०२५

# जाहिरात

---

**विषय :- वैद्यकीय अधिकारी हे रिक्त पदे विभागीय निवड समितीमार्फत Walk in Interview द्वारे भरणेबाबत.**

श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथील तक्त्यात दर्शविलेली पदे स्थानिक निवड समिती मार्फत १२० दिवसाकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी **Walk in Interview दिनांक १४/१०/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. घेण्यात येणार आहे.**

तरी अर्हतता प्राप्त उमेदवारांनी खालील कालावधीत रुग्णालयाच्या संकेत स्थळावर अर्जाचानमुना देण्यात आलेला आहे. तो भरुन शैक्षणिक अर्हततेच्या सर्व छायांकित प्रत साक्षांकित करुन अर्जासोबत जोडण्यात यावे व सदरचा अर्ज श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथील आवक विभागात जमा करावा तसेच मुलाखतीस येताना मुळ सर्व कागदोपत्र घेऊन स्वखर्चाने उपस्थित रहावे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | पदाचे नांव | एकुण पदे | अर्ज स्विकारण्याचा दिनांक | Walk Interview |
|---|---|---|---|---|---|
| १ | अधिष्ठाता, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर | वैद्यकीय अधिकारी (MO/CMO) | ०१ (एक) | दिनांक ०८/१०/२०२५ व दिनांक १०/१०/२०२५ या कालावधित सकाळी १०.०० ते ५.०० पर्यंत आवक विभागात | दिनांक १४/१०/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता |

**वैद्यकीय अधिकारी (MO/CMO) या पदासाठी निवड प्रक्रिया खालील प्रमाणे घेण्यात येईल.**

**-: प्राधान्य क्रम खालील प्रमाणे : -**

१) **प्राधान्य क्रम १:-** पदव्युत्तर पदवी अथवा पदवीका या महाविद्यालयातुन प्राप्त केली असल्यास व बंधपत्रित असल्यास.

२) **प्राध्यान्य क्रम २:-** पदव्युत्तर पदवी अथवा पदवीका महाराष्ट्रातील कोणत्याही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातुन प्राप्त केली असल्यास व बंधपत्रित असल्यास.

३) **प्राध्यान क्रम ३:-** या महाविद्यालयातुन पदवी प्राप्त केली असल्यास व बंधपत्रित असल्यास.

४) **वयोमर्यादा :-** शासन अधिसुचना व शासनाच्या नियमानुसार लागू राहिल. तसेच मागासवर्गीय उमेदवारासाठी ५ वर्षे शितल राहिल.

(पृष्ठ क्र. २ वर)

Scanned by CamScanner

**टीप :-** १) सदर जाहिरातीमध्ये कोणताही बदल किंवा रद्द करण्याचे किंवा निवड यादी कोणत्याही वेळी रद्द करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता यांच्याकडे राहतील.

२) क्लिनिकल विषयातील पद्व्युत्तर व पदवी अथवा पद्व्युत्तर पदविका धारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. एकाच विषयातील दोन किंवा अधिक पद्व्युत्तर पद्वी अथवा पद्व्युत्तर पदविका धारक उमेदवार असतील तर पद्व्युत्तर विषयातील एकूण गुणानुक्रमानुसार मेरीट लिस्ट लावण्यात येईल. पद्व्युत्तर पदविका धारक (क्लिनिकल शाखेच्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल) जर उमेदवार उपलब्ध न झाल्यास एम.बी.बी.एस पदवी धारक उमेदवारांना प्राध्यान्य देण्यात येईल. मेरीट लिस्टअॅग्रीगेट मार्कानुसार करण्यात येईल (प्रथम वर्ष+द्वितीय वर्ष + तृतीय वर्ष)

३) याच महाविद्यालयातील बंधपत्रित उमेदवारांना प्रथम पसंती देण्यात येईल त्यानंतर इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील बंधपत्रीत उमेदवारांना पसंती देण्यात येईल.

४) मुलाखती वेळी मुलाखतीस आलेल्या सर्व पात्र उमेदवारांची प्रतिक्षायादी तयार करण्यात येईल व पुढील कालाधीत रिक्त होणाऱ्या वैद्यकीय अधिकारी पदावर नियुक्ती देण्यात येईल.

मुलाखतीस उपस्थित राहणाऱ्या उमेदवाराला मुलाखतीसाठी स्वःखर्चाने हजर रहावे लागेल. मुलाखत ही अधिष्ठाता, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे उपअधिष्ठाता यांच्या कार्यालयात घेण्यात येईल.

**(डॉ. ऋ. अ. दे. जयकर)**
**अधिष्ठाता,**
श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर

**प्रति,**

१) सुचना फलक, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर.
२) वैद्यकीय अधिक्षक, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर.
३) संकेस्थळ :- www.vmgmc.edu.in

Scanned by CamScanner